नगरसचिव

पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र. १२**

**नोव्हेंबर २०१६**

पुणे महानगरपालिकेची **मासिक सर्वसाधारण सभा गुरुवार, दि.१७ नोव्हेंबर २०१६ रोजी दुपारी ०३–०० ( तीन ) वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात** (मनपा सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**प्रश्नोत्तरे**

महाराष्ट्र म.न.पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**स्थायी समितीचे ठराव**

विषय क्र.८२७

संदर्भ – १) मा.गणेश बिडकर यांचे दि. ८/२/२०१६ चे पत्र.
२) स्थायी समिती ठ.क्र.२३०२ , दि.९/२/२०१६
३) मनपा ठराव क्र.८८९, दि.२२/२/२०१६
४) मनपा ठराव क्र.१, दि.२५/४/२०१६
५) मनपा ठराव क्र.५६७, दि.२३/८/२०१६

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. ६५ मध्ये लोहियानगर येथे झोपडपट्टी धारकांकरिता एस.आर.ए. प्रकल्प सुरू आहे. सदर ठिकाणी राहत असलेल्या झोपडपट्टी धारकांना तात्पुरत्या स्वरूपामध्ये पुणे म.न.पा. मालकीच्या स.नं. ५३९ सि.टी.एस. १५४, घोरपडे पेठ येथील ट्रॅझिट कॅम्पमध्ये स्थलांतर करून भाडयाने पत्र्याचे शेड देण्यात आलेले आहे. सदर ठिकाणी एस.आर.ए. प्रकल्प होण्याकरिता अजून काही कालावधी आहे.

तरी झोपडपट्टी धारकांना तात्पुरत्या स्वरूपामध्ये पुणे म.न.पा.च्या मालकीच्या स.नं. ५३९ सि.टी.एस. १५४, घोरपडे पेठ येथील ट्रॅझिट कॅम्पमध्ये दिलेल्या एकूण २६२ पत्र्याचे शेडची मुदत अजुन ५ वर्षे वाढविण्यास व पुढील ५ वर्षांचे भाडे वसूल करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**( टिप – सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २०१६ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.५७६, दि.२३/९/२०१६ झाला आहे. )**

विषय क्र.८२८

संदर्भ – १) मा.सुनिल गोगले व मा.फारुक इनामदार यांचे दि.२०/९/२०१६ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१२७७,दि.२०/९/२०१६

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र.२६ मध्ये विविध विकासाची कामे करणेसाठी र.रू. २ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, १८.सांस्कृतिक केंद्र, पान क्र. ११२, अ.क्र. १६, शहरामध्ये स्मारके उभारणे, (यादी क्र. जे२६), पान क्र. २३७, अ.क्र. ६, कोथरुड येथे शिवसृष्टी उभारणे, (बजेट कोड नं.सीई२८अे१९६+) | २ कोटी | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| प्रभाग क्र.२६ मध्ये विविध विकासाची कामे करणे | --- | २ कोटी |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**( टिप – सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २०१६ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.६९४,दि.१३/१०/२०१६ झाला आहे. )**

## मा.विधी समितीचा ठराव

**विषय क्र.८२९**

संदर्भ – १) मा.कक्ष अधिकारी,नगर विकास विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र जा.क्र.पीएमसी ३०१४ / मु.मं.सं.क्र.९०४ व ८९८/प्र.क्र.१३३/नवि–२२,दि.२/३/२०१५

२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शहर अभियंता/६९, दि.१३/५/२०१५ चे पत्र.

३) मा.सौ.वैशाली बनकर, मा.सचिन दोडके. मा.सौ.प्रतिभा ढमाले, मा.सौ.निलिमा खाडे, मा.सौ.शितल सांवत, मा.सौ.निता मंजाळकर,मा.सतिश म्हस्के,मा.सौ.सुनंदा गडाळे, यांची दि.२६/६/२०१५ ची उपसूचना

४) विधी समितीठराव क्र. ९, दिनांक २६/६/२०१५

५) मनपा ठराव क्र.४७३, दि.३०/११/२०१५

६) मनपा ठराव क्र.६५, दि.२५/४/२०१६

विषय:– हडपसर–हवेली स्वतंत्र महानगरपालिका स्थापन करणेबाबत

-----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे विचारात घेऊन व विधी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिकेची सध्याची हद्द तसेच मा.मुख्य सभा ठराव क्र.५३५,दि.१८.१२.२०१३ अन्वये सभोवतालची ३४ गावे पुणे महापालिकेच्या हद्दीमध्ये समाविष्ठ करण्यासंदर्भात मा.मुख्य सभेने केलेला ठराव विचारात घेऊन या ३४ गावांव्यतिरिक्त इतर गांवाची स्वतंत्र महानगरपालिका स्थापन करणेबाबत शासन स्तरावर निर्णय व्हावा.व त्यास मान्यता द्यावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**( टिप – सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २०१६ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.५४०, दि.२३/८/२०१६ झाला आहे. )**

## मा.शहर सुधारणा समितीचा ठराव

**विषय क्र.८३०**

संदर्भ – १) मे. शासनाचे दि.०३.०२.२००७ चे एम. आर. टी. पी. ॲक्ट १९६६ चे कलम १५४ अन्वयेचे निदेश क्र. टीपीएस/संकिर्ण०६/सी.आर.–५२७/०६/युडी–१३.

२) मा. अवर सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय यांना जा. क्र. डीपीजी/२४३, दि.२२.०३.२००७ अन्वये पाठविलेले पत्र.

३) मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडील जा. क्र. टिपीएस/१८०७/ प्र.क्र. ८१९/०७/नवि–१३, दि.१६.०८.२००७ चे पत्र.

४) मा.शहर सुधारणा समिती मार्फत मा.मुख्य सभेकडे सादर केलेले विषयपत्र जा.क्र.मआ/नअ/०६, दि.३/४/२०१०.

५) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२७, दि.१४/५/२०१०.

६) मा.मुख्य सभा ठराव क्र.२४१, दि.२५/१०/२०१०.

७) दै. सकाळ व डीएनए वर्तमान पत्रात दि.२/११/२०११ रोजी प्रसिद्ध केलेले प्रकटन.

८) मा.विधी सल्लागार यांचा अभिप्राय जा.क्र. १०४४, दि. ५/८/१४.

९) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/७३३,दि.१/१२/२०१४ चे पत्र.

१०) शहर सुधारणा समिती ठ.क्र.२४०, दि.२३/१/२०१५

११) मनपा ठराव क्र.७३२, दि.१९/३/२०१५

१२) मनपा ठराव क्र.१०२, दि.६/८/२०१५

१३) मनपा ठराव क्र.५२९, दि.३०/११/२०१५

१४) मनपा ठराव क्र.६६, दि.२५/४/२०१६

विषय – टी.डी.आर. बाबत एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ३७(१) सह कलम १५४ अन्वये मे.शासन निदेश दि.३/२/२००७ अन्वये नियम विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समाविष्ट करणेबाबत.

---

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन–

महानगरपालिकांकडील टी.डी.आर. मान्यतेबाबतच्या नियमावलीबाबत संदर्भ क्र.१ च्या पत्रामध्ये मे. शासनाने एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्याचे व कलम १५४ अन्वये नोटीफिकेशनच्या दिनांकापासून कार्यवाही करण्याचे निर्देश देणेत आलेले होते ते पुढीलप्रमाणे 'Transferable development rights (TDR) shall not be permissible once an award has been declared under the acquisition process & or possession has already been delivered to the municipal corporation under any act."

तथापि संदर्भ क्र.२ चे पत्र मा. अवर सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय यांना पाठविण्यात आलेले आहे. त्यामध्ये ''पुणे मनपाकडून बी.पी.एम.सी. ॲक्ट कलम २१३ व ७७ अन्वये मान्य विकास आराखड्यातील विविध प्रयोजनासाठी असलेल्या आरक्षणातील जमिनीचे तडजोडीने कुठलाही मोबदला न देता ताब्यात घेतलेल्या क्षेत्रासाठी एफ.एस.आय./टी.डी.आर./नुकसान भरपाई देण्याचे मान्य करुन आगाऊ ताबे घेण्यात आलेले आहेत व तसे संबंधीत नागरिकांना लेखी कळविण्यात आलेले आहे. अशा प्रकारे सार्वजनिक प्रयोजनाकरीता दि.०३.०२.२००७ पूर्वी आगाऊ ताब्यात घेतलेल्या व अशा जागा मालकांना कोणत्याही स्वरुपात मोबदला न दिलेल्या प्रकरणात संदर्भ क्र.१ मध्ये नमुद केलेले निर्देश लागू होणार नाहीत. अशी धारणा असून ती कायम करुन मिळणेची विनंती केली होती.

प्रस्तुत पत्रास अनुसरुन मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांनी संदर्भ क्र.३ पत्रान्वये शासनाच्या दि.०३.०२.२००७ रोजीच्या निर्देशांमधील तरतूदीसंबंधी खालीलप्रमाणे स्पष्टीकरण दिलेले आहे.

१) ज्या प्रकरणांमध्ये निवाडा (Award) जाहीर करण्यात आलेला नाही आणि जमिनीचा ताबा घेण्यात आलेला नाही अशा प्रकरणी टी.डी.आर. अनुज्ञेय होईल.

२) ज्या जमिनींचा ताबा घेण्यात आला आहे आणि कोणत्याही कायद्यातील तरतुदींनुसार महानगरपालिकेने अथवा शासनाने मोबदल्याची रक्कम पूर्णत: किंवा भागश:

अ) देऊ केली असेल किंवा (Tendered)

ब) कोषागारात किंवा न्यायालयात जमा (Deposit) केली असेल किंवा

क) जमिन मालकाने अथवा हिसंबंधित व्यक्तिने स्विकारली असेल किंवा

ड) हितसंबंधितांनी/जमिनमालकांनी भूसंपादन अधिनियमातील कलम १८ अन्वये वाढीव मोबदल्याची मागणी केली असेल अशा प्रकरणात टी. डी. आर. देय होणार नाही.

३) ज्या प्रकरणांमध्ये भूसंपादन निवाडा (अॅवॉर्ड) जाहीर करण्यात आलेला नाही मात्र मोबदल्याची कोणतीही रक्कम न देता जागेचा आधी ताबा घेतला आहे अशा प्रकरणी टी. डी. आर. अनुज्ञेय होईल. मात्र भूसंपादन अधिकाऱ्यांना यासंबधी माहिती देऊन संबधित जमिनधारकाचे नाव निवाड्यामधून वगळण्याच्या अथवा निवाड्यामध्ये नुकसान भरपाई ऐवजी टी. डी. आर. दर्शवून निवाडा जाहीर करण्याच्या सूचना द्याव्यात व कोणत्याही प्रकारे महानगरपालिके कडून टी. डी. आर. आणि भूसंपादन प्रकरणात नुकसान भरपाई असा दुहेरी फायदा दिला जाणार नाही याबाबत आयुक्त यांनी वैयक्तीक दक्षता घ्यावी.

मे. शासनाचे संदर्भ क्र.१ चे निदेश व मे.शासनाचे संदर्भ क्र.३ चे स्पष्टीकरणानुसार पुढील कार्यवाही करण्याचे दृष्टीने एम.आर.टी.पी. ॲक्टचे कलम ३७(१) नुसार सुधारित नियम समाविष्ट करणे, यासाठी संदर्भ क्र.४ अन्वये मा.शहर सुधारणा समितीमार्फत मा.मुख्य सभेकडे विषयपत्र सादर करणेत आले होते. त्यास अनुसरून संदर्भ क्र.६ अन्वये मा.महापालिका सभेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार नियमावलीमध्ये नियम समाविष्ट करणेस मान्यता दिली आहे.

संदर्भ क्र.६ अन्वयेच्या मा.मुख्य सभा ठरावानुसार मराठी वृत्तपत्र दै.सकाळ व इंग्रजी वृत्तपत्र डीएनए मध्ये दि.२/११/२०११ रोजी जाहिर प्रकटन दिले होते. प्रसिद्ध केलेल्या जाहिर प्रकटनानुसार पुणे महानगरपालिकेस एकुण ४ हरकती प्राप्त झालेल्या आहेत. हरकतदारांच्या हरकतीच्या मुद्द्यानुसार महानगरपालिकेचे मत नोंदविणेत आलेले आहे. या प्रकरणी श्री.जयप्रकाश गोयल यांनी कौसरबाग सोसायटी, स.नं.१२(पैकी),कोंढवा येथील टी.डी.आर. संदर्भात मे.सर्वोच्च न्यायालयात लिव्ह पिटिशन ३००८,३००९/ २००९ बाबत उल्लेख करून दावा प्रलंबित असल्याबाबत कळविले आहे. त्याबाबत निर्णय झाल्याखेरीज अशा प्रकारच्या फेरबदलास आक्षेप घेतला आहे.

कोंढवा स.न.१२, हि.नं.१,५,६,८,९,१०/१अ,११ या मिळकतीमधील अस्तित्वातील गार्डनचा टी.डी.आर. मिळणेसंदर्भात मे.उच्च न्यायालयात दाखल रिट पिटिशन नं.७००६/२००६ व रिव्हिव पिटिशन क्र.१३७/२००९ मध्ये, मे.उच्च न्यायालयाने, मे.शासनाचे दि.३/२/२००७ चे शासन निदेश रद्द ठरविलेले आहे. या निर्णयाच्या विरूद्ध पुणे महानगरपालिकेने व शासनाने मे.सर्वोच्च न्यायालयात स्पेशल लिव्ह पिटिशन ३००८ व ३००९/२००९ दाखल केले आहे. यामध्ये मे.सर्वोच्च न्यायालयाने मे.शासनाचे निदेशाबाबत अद्याप कोणतीही ऑर्डर झालेली नाही.

हरकतदारांच्या हरकतीनुसार मा.विधी सल्लागार यांचा अभिप्राय अपेक्षिला होता. त्याप्रमाणे सदर दाव्याचे मे.सर्वोच्च न्यायालयात काम पाहणारे म.न.पा.चे वकील श्री. मकरंद आडकर यांनी पुढीलप्रमाणे कायदेशीर अभिप्राय दिलेला आहे. "In the circumstances, there is no legal impediment for the corporation to act as per directive of the Government." म्युनिसिपल प्रॉसिक्युटर यांच्या संदर्भ क्र.८ चे पत्रानुसार विषयांकित प्रकरणी मे.शासनाचे निदेशाप्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही असे कळविलेले आहे.

मा.शहर सुधारणा समिती व मुख्य सभेच्या मान्यतेप्रमाणे पुढील प्रमाणे नियम विकास नियंत्रण नियमावली मध्ये समाविष्ट करणेसाठी कलम ३७(२)चे कार्यवाहीसाठी सादर करीत आहोत.

| Existing Rules | Proposed Modified Rules<br>(Rules as per Govt.order and directives of date 16-8-2007) |
|---|---|
| N-2-4-17 (Page no.220) | |
| Grant of TDR in cases where lands are under acquisition:<br>Where Land Acquisition has been declared but request was made for TDR to the Special Land Acquisition Officer after 30 September 1993 i.e. the date of publication of these Draft Development Control Regulation containing TDR concept<br>ii) Possession of the land has been delivered without having received part or full compensation under either the Maharashtra and Town Planning Act, Bombay Provincial Municipal Corporation Act, private negotiation or under any Act for the time being in force within 12 years prior to 30 September 1993. | 1)Transferable Development rights (TDR ) shall be permissible in the cases where award has not been declared and possession of land has not been taken.<br>2) Transferable Development Rights (TDR) shall not be permissible where possession of land has been taken & where amount of compensation fully or partly by Municipal Corporation or Government under any provision of any act<br>a) tendered.<br>**OR**<br>b) deposited in treasury or court<br>**OR**<br>c) Land owner or interested person has accepted part or full compensation<br>**OR**<br>d) Land owner or interested person have demanded enhanced compensation under section 18 of Land acquisition act 1894.<br>3) TDR shall be permissible in the cases where Land acquisition award has not been declared but the possession of the land has already been taken without giving part or full compensation .<br>But Special Land Acquisition Officer should be informed to exclude the name of the land owners/interested persons from the award or should be directed to declare TDR as compensation in the award and the Municipal Commissioner should take proper precaution so that in no case dual benefit of TDR and cash Compensation be given from Municipal Corporation |

वरीलप्रमाणे विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नियम समाविष्ट करणेकरिता एम.आर.टी.पी. ॲक्टचे कलम ३७(१) अन्वये प्रसिद्ध केलेले प्रकटनानुसार प्राप्त हरकती व सुचनांवर सुनावणी घेऊन अहवाल सोबत जोडलेला आहे. तरी सदर प्रकरणी मे.शासनाचे कलम ३७(२) अन्वये अंतिम मान्यतेचे आदेश मिळणेकरिता, मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**( टिप – सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २०१६ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.५४१ दि.२३/८/२०१६ झाला आहे.")**

**मा.सभासदांचा प्रस्ताव**

**विषय क्र.८३१**

संदर्भ :– मा. रविंद्र माळवदकर व मा. दत्ता बहिरट यांची सूचना दि. १८/१०/२०१६

सध्या माहिती अधिकार अधिनियम – २००५ अंतर्गत अनेक कार्यकर्ते स्वत:च्या जीवाची कोणतीही परवा न करता भ्रष्टाचाराच्या विरोधात काम करत असतात. त्यामुळे अनेक वेळा माहिती अधिकार कार्यकर्त्यांना स्वत:चे प्राण गमवावे लागल्याचे निदर्शनात आले आहे. तरी अशा कार्यकर्त्यांना " महसूल विभागीय शहीद " असे घोषित करुन केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी त्यांचे कुटुंबियांना विशेष सवलती पुरवाव्यात अशी ही सभा दोन्ही सरकारला विनंती करत आहे.

**नगरसचिव कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका,**
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :– ७/११/२०१६.

**सुनील पारखी**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**